शेतकरी गौरव समारोह- दि. १ जुलै २०११

शेती हा मानवाच्या पारंपरिक उपजिविकेचा मुख्य व्यवसाय असून देशातील तसेच राज्यातील बहुसंख्य लोकसंख्या शेतीवर आधारित आहे. शेतीचा विकास झाल्याशिवाय देशाच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न साकार होणार नाही. म्हणूनच राष्ट्रीय पातळीवर सन २००७ मधील राष्ट्रीय विकास परिषदेततील ठरावानुसार देशात कृषि विकासासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजना व राष्ट्रीय सुरक्षा अभियान सुरु करण्यात आले.

वाढत्या लोकसंख्यामुळे अन्नधान्याची गरज वाढत आहे. उपलब्ध जमिनीमध्ये जास्तीत जास्त उत्पादन घेण्याच्या दृष्टीने कृषि विद्यापीठ, कृषि संशोधन केंद्र, यातील पिक उत्पादन वाढीचे नवीन तंत्रज्ञान शेतक-यापर्यंत यशस्वीरित्या पोहोचविण्याचे काम शासनाच्या कृषि विभागाने व कृषि विद्यापीठाने केलेले आहे. शेतकरी स्वतःदेखील एक संशोधकच असतो. तो स्वतःच्या जमितीत विविध प्रकारच्या पिकांची लागवड करीत विविध तंत्रज्ञानाच्या वापराने अधिकाधिक उत्पादन घेण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतो. शेतक-यांमधील या प्रयोगशील व संशोधक वृत्तीला चालना मिळावी म्हणून कृषि क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामाचा गौरव शासन आजपर्यंत विविध पुरस्कारांच्या माध्यमांतून करत आलेले आहे.

शासनामार्फत प्रयोगशील व प्रगतीशिल शेतक-यांना देण्यात येणारे विविध पुरस्कार

१.डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न
२.वसंतराव नाईक कृषिभूषण
३.जिजामाता महिला कृषीभूषण
४.वसंतराव नाईक कृषीभूषण सेद्रियशेती
५.वसंतराव नाईक शेतीनिष्ठ
६.वसंतराव नाईक शेतीमित्र
७.उदयान पंडित

सन २०११ हे वर्ष महाराष्ट्र राज्य स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून मागील ५० वर्षात ज्या शेतक-यांच्या अथक परिश्रमामुळे कृषि विकासात राज्य अग्रस्थानी राहिले. त्या शेतक-यांचे प्रतिनिधीत्व करणा-या वरील पुरस्कार प्राप्त शेतक-यांचा गौरव आणि राज्याच्या कृषि विकासात कृषि शिक्षण,संशोधन व विस्तार कार्याद्वारे उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल राज्यातील चारही कृषि विद्यापीठांचे माजी कुलगुरु व राज्याच्या कृषि विकासात धोरणात्मक निर्णय घेऊन चालना दिलेल्या सर्व माजी कृषि व फलोत्पादन मंत्री/राज्य मंत्री यांचा सन्मान करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्याचे कृषि व पणन मंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी सदर संकल्पना मांडली असून ती पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने शासनामार्फत दिनांक १ जुलै २०११ रोजी दुपारी ३.३० वा. शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे (बालेवाडी) पुणे येथे या शेतकरी गौरव सोहळयाचे आयोजन केले आहे.

१ जुलै हा दिवस राज्यात माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतरावजी नाईक यांचा जन्मदिवस असून त्यांनी कृषि क्षेत्रात दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल तो कृषि दिन म्हणून साजरा केला जातो. याच दिवशी राज्यातील कृषि क्षेत्राच्या विकासात अमूल्य योगदान दिलेल्या मान्यवरांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात येत असल्याचे त्यास विशेष औचित्य प्राप्त झाले आहे.

राज्यातील शेतक-यांमध्ये उत्साह व नवीन प्रेरणा निर्माण करण्यासाठी तसेच या पुरस्कार प्राप्त शेतक-यांचे अनुकरण राज्यात इतरत्र व्हावे व राज्याची कृषि प्रगतीची गौरवशाली परंपरा कायम राखावी तसेच या परंपरेचे प्रदिर्घ काळ स्मरण राहावे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमात राज्यातील सर्व कृषीरत्न (१०), कृषीभूषण (१५८), जिजामाता कृषीभूषण (६३), कृषीभूषण सेंद्रीय शेती (३), शेतीनिष्ठ (१०२८), शेतीमित्र (४३) आणि उद्यानपंडीत (१२१) इत्यादी पुरस्कारांनी गौरवण्यात आलेले एकूण १४२६ शेतक-यांना, कृषी विद्यापीठांचे माजी कूलगुरु व माजी कृषी / फलोत्पादन मंत्री आणि राज्यमंत्री यांचा स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात येणार आहे. या सर्व अतिथींची प्रवास व निवास व्यवस्था करण्यात आली असून त्यांना कृषि विभागाचे संपर्क अधिकारी नेमण्यात आले आहेत.

हा गौरव समारोह मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते, मा. डॉ. एम. एस. स्वामीनाथन, भारतीय हरीतक्रांतीचे जनक व जागतिक किर्तीचे कृषि शास्त्रज्ञ तथा अध्यक्ष, एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशन, चेन्नई यांचे अध्यक्षतेखाली आणि मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रमूख उपस्थितीत आयोजित केला आहे. या कार्यक्रमास विद्यमान मंत्रीमहोदय, माजी मंत्री/राज्यमंत्री, कृषि परिषदेचे उपाध्यक्ष, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, खासदार, आमदार, जिल्हा परिषद कृषि समिती सभापती, पंचायत समिती सभापती व सरपंच यांना निमंत्रित केले आहे.

शेतकरी गौरव समारंभाच्या निमित्ताने कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये अल्प, अत्यल्प शेतक-यांसाठी कृषि यांत्रिकीकरणाचे नवनवीन अवजारे, ऊस कापणी यंत्र इत्यादींचा प्रामुख्याने समावेश आहे. तसेच शेतमालाचे स्थानिक स्थरावर प्राथमिक हाताळणी व प्रक्रिया इ. विषयांशी संबंधित सुमारे ४० स्टॉल्स चा समावेश राहणार आहे. यामध्ये महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, राज्यातील कृषि विद्यापिठे, स्वयंसेवी व व्यापारी संस्था इ. चा सहभाग राहणार आहे. लोकरंजनातून ज्ञान प्रबोधन होणेसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये महाराष्ट्र राज्याच्या कृषि विभागासह महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. मुंबई, महाराष्ट्र राज्य कृषि उदयोग विकास महामंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पूणे आणि महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पूणे इ. चा समावेश आहे.